# जनसंपर्क अधिकारी

पोलीस आयक्त, मिरा-भाईंदर, वसई-विरार यांचे
कार्यालय रामनगर सृष्टी, मिरारोड पुर्व, जि. ठाणे
दुरध्वनी क्र. ०२२-२९४५१००१
**E-mail: pro.cp.mb-vv@mahapolice.gov.in**

प्रेस नोट क्र-४२८-२०२४ दिनांक - १३/११/२०२४

## प्रेस नोट

### "गावठी हातभट्टीची दारु तयार करणा-या अड्ड्यावर छापा टाकुन लाखोचा मुद्देमाल नष्ट करण्यात गुन्हे शाखा कक्ष -२ वसई व नायगाव पोलीस ठाणे यांना संयुक्त कारवाईस यश"

-------ooooo-------

आगामी २०२४ विधानसभा निवडणुकीच्या अनुषंगाने अवैधरीत्या देशी दारु विक्री अगर वाहतुक करणारे व्यक्तीं तसेच गावठी दारु निर्मिती करणा-या भट्टयांची माहीती काढुन त्या नष्ट करण्याबाबत मा. वरीष्ठांकडुन आदेश प्राप्त झाले आहेत. मा. वरीष्ठांकडुन मिळालेल्या आदेशानुसार अवैध धंदयांची माहीती काढत असताना नायगाव पोलीस ठाण्याच्या अधिकारक्षेत्रातील कामण गावातील देवकुंडी जंगल परीसरात सुनिल यशवंत वाघात रा. मु-देवकुंडी, पो-कामण, वसई पुर्व, जि. पालघर हा व्यक्ती अवैध रीत्या दारुच्या निर्मितीची भट्टी लावत असल्याची गोपनीय बातमीदाराकडुन माहीती प्राप्त करण्यात आली. प्राप्त गोपनीय माहीतीवरुन गुन्हे शाखा कक्ष -२ वसई आणि नायगाव पोलीस ठाणे यांचे पोलीस अधिकारी व अंमलदार यांचे मार्फत संयुक्त कारवाई करण्याबाबत पोनिरी/ शाहुराज रणवरे प्रभारी अधिकारी यांनी आदेशीत केल्याने पोलीस अधिकारी व अंमलदार यांचे स्टाफ तात्काळ रवाना होवून कामण गावातील देवकुंडी जंगल परीसरात छापा घालुन करण्यात आलेल्या कारवाई करण्यात आली. या दारुच्या छापा कारवाईमध्ये १) ५००० लिटर नवसागर गुळ मिश्रीत वॉश २) २४० लिटर गावठी हातभट्टीची दारु व गावठी हातभट्टीची दारु तयार करण्याची साधने मिळुन २,२७,७००/- रुपये किंमतीचा मुद्देमाल नाश करण्यात आला असुन आरोपीत नामे सुनिल यशवंत वाघात रा. मु-देवकुंडी, पो-कामण, वसई पुर्व, जि. पालघर याचे विरुध्द पोशि/२३३९३ अजित सुरेश मैड, नेमणुक - गुन्हे शाखा कक्ष-२ वसई यांनी सरकार तर्फे नायगाव पोलीस ठाणे येथे फिर्याद दिली असुन सदर बाबत नायगाव पोलीस ठाणे गुन्हा रजि नंबर ५६१/२०२४ महाराष्ट्र दारुबंदी अधिनियम १९४९ चे कलम ६५ (ब), (क), (ड) व (फ)प्रमाणे गुन्हा नोंद करण्यात आला आहे.

उपरोक्त कामगिरी श्री. मधुकर पाण्डेय, पोलीस आयुक्त सो, श्री. दत्तात्रय शिंदे, अपर पोलीस आयुक्त सो, श्री. अविनाश अंबुरे, पोलीस उप आयुक्त सो (गुन्हे), श्री. मदन बल्लाळ सहा. पोलीस आयुक्त सो (गुन्हे) मि.भा.व.वि. पोलीस आयुक्तालय यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक/ शाहूराज रणवरे, सपोनिरी/ सागर प्रकाश शिंदे, पोहवा/०००१५ रविंद्र एकनाथ पवार, पोहवा/०६०२५ सचिन विलास पाटील, पोहवा/०५०३३ जगदिश एकनाथ गोवारी, पोहवा/ ०६१०७ रमेश आलदर, पोशि/२३३९३ अजित सुरेश मैड, पोशि/२३९४२ प्रतिक अप्पासाहेब गोडगे सर्व नेमणुक गुन्हे शाखा कक्ष-२ वसई तसेच पोउनिरी/ अनिल मोरे, पोहवा/०६०७६ महेश सहदेव बोडके, पोशि/१४०७१ दिगंबर प्रभाकर काळे, मपोशि/२३६६१ कामिनी पवार सर्व नेम- नायगाव पोलीस ठाणे यांनी संयुक्तरीतीने पार पाडली आहे.





